# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

**हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा**

लोकमत पुणे, बुधवार, दि. २ सप्टेंबर २०१५ ९

**आंतरमहाविद्यालयातीन स्पर्धा : नाशिकच्या विवेक चित्ते व काजल बोरस्ते यांना सांघिक विजेतेपद**

# वक्तृत्व स्पर्धेत पुण्याचा सागर मदने प्रथम

राजगुरुनगर : हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांच्या जयंतीनिमित्त हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्वस्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थी सागर मदने याने प्रथम क्रमांक पटकावला. सांघिक विजेतेपदाचा चषक नाशिकच्या एचपीटी आणि आरवाय कॉलेजचे विवेक चित्ते व काजल बोरस्ते यांनी मिळविला.



हुतात्मा राजगुरु यांच्या जयंतीनिमित्त आयोजित आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेतील विजेता नाशिकच्या एचपीटी आणि आरवाय महाविद्यालयाचा संघ अध्यक्ष देवेंद्र बुट्टे-पाटील आणि उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना.

◆ या स्पर्धेचे हे २६वे वर्ष आहे. पुणे विद्यापीठ कक्षेतील सर्व महाविद्यालयांतील वरिष्ठ व कनिष्ठ विभागांतील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली असते. या वर्षी एकूण २४ महाविद्यालयांतील ४४ स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेतला. या वर्षी स्पर्धेचे विषय 'डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, धर्मवीर संभाजी, योगा-आरोग्याचा राजमार्ग व संत जनाबाई-कार्य आणि कर्तृत्व' असे होते.

स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे : प्रथम : सागर मदने (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), द्वितीय : निखिल नागरकर (सिंहगड कॉलेज ऑफ सायन्स आंबेगाव), तृतीय : अशोक शिंदे (न्यू आर्ट्स आणि सायन्स कॉलेज पारनेर) यांनी पटकावला. रोख रक्कम, हुतात्मा राजगुरु चषक व साहेबरावजी बुट्टे-पाटील स्मृतिचिन्ह असे बक्षिसांचे स्वरुप होते. उत्तेजनार्थ बक्षिसे : शुभदा धुमाळ (हुतात्मा राजगुरु महाविद्यालय राजगुरुनगर), स्वप्निल इंगवणे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) विवेक चित्ते (एचपीटी आणि आरवाय कॉलेज, नाशिक), अक्षय चाचर (शरदचंद्र पवार कॉलेज, जेजुरी), योगेश भोसले (तळेगाव दाभाडे कॉलेज) आणि वृषाली घाटपांडे (फर्ग्युसन कॉलेज पुणे) यांना मिळाली.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी स्पर्धेचे उद्घाटन केले. या प्रसंगी संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य जी. बी. शिंदे उपस्थित होते. तर, बक्षीस वितरण अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक सुशील शिंगवी यांच्या हस्ते झाले. परीक्षक म्हणून डॉ. संजय घोडेकर, अरुण कोळेकर, अश्विनी सातव डोके यांनी काम पाहिले. प्रा ए. बी. कातळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. व्ही. बी. दौडकर यांनी निकालवाचन केले. स्पर्धा संयोजन समितीचे प्रमुख प्रा. [illegible] एन. चौधरी यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख